# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ११३ वा ❑ शुक्रवार दि.१३ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# उड्डाणादरम्यान विमाने वारंवार का कोसळतात?






**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान २४२ प्रवाशांना घेऊन उड्डाण केल्यानंतर काही क्षणातच कोसळले. अहमदाबाद विमानतळाजवळ हा अपघात झाला. अपघातानंतर विमानाचे अवशेष जमिनीवर विखुरलेले दिसले. अग्निशमन दलाचे पथक आग विझवण्याचा प्रयत्न करताना दिसले.यामध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचे निधन झाले आहे. विमानात २४२ प्रवासी होते. त्यापैकी ५३ ब्रिटिश, ७ पोर्तुगीज आणि एक कॅनेडियन नागरिक होता. आतापर्यंत अपघातस्थळावरून १०० मृतदेह सापडले आहेत. बहुतेक मृतदेह इतके जळाले आहेत की त्यांची ओळख पटवणे खूप कठीण आहे. डीएनए चाचणीनंतरच त्यांची ओळख पटवणे शक्य होईल.

ज्या इमारतीवर विमान आदळले त्या इमारतीत अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलचे डॉक्टर होते. माहितीनुसार, १५ डॉक्टर जखमी झाले आहेत. एअर इंडियाचे विमान क्रमांक एआय-१७१ दुपारी १:३८ वाजता उड्डाण केले. दुपारी १:४० वाजता ते कोसळले.माहितीनुसार, विमान विमानतळाच्या भिंतीजवळ आणि एअर कस्टम कार्गो ऑफिसजवळ कोसळले. विमान पडताच संपूर्ण परिसरात धुराचे लोट दिसू लागले.

अपघाताचा बळी पडलेले विमान बोईंग कंपनीचे होते. हे विमान ११ वर्षे जुने होते आणि डिसेंबर २०१३ मध्ये खरेदी केले गेले होते. बोईंगचे ७८७ ड्रीमलायनर विमान विमान कंपन्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. एअर इंडिया व्यतिरिक्त, इतर अनेक विमान कंपन्या देखील त्यांचा वापर करतात.

**टेकऑफचा वेळ हा सर्वात महत्त्वाचा काळ असतो**

टेकऑफचा वेळ हा सर्वात महत्त्वाचा काळ मानला जातो. जर आपण आकडेवारीवर विश्वास ठेवला तर, जगातील सर्व विमान अपघातांपैकी सुमारे ३५ टक्के अपघात टेकऑफ दरम्यान किंवा त्यानंतर होतात. तर टेकऑफनंतर हा दर कमी होतो. टेकऑफच्या वेळी, विमान जमिनीवरून उच्च गतीने उड्डाण करते. यावेळी, पायलटला धावपट्टी, इंजिन, हवामान आणि विमानाच्या यंत्रणेवर बारकाईने लक्ष ठेवावे लागते, कारण त्यांच्यावर जास्तीत जास्त दबाव असतो.




**इंजिन बिघाड**

टेकऑफच्या वेळी, इंजिन त्याच्या कमाल क्षमतेवर असते. अशा परिस्थितीत, इंजिनमध्ये कोणत्याही प्रकारची तांत्रिक बिघाड जसे की पक्ष्यांची टक्कर, इंधन दाब समस्या किंवा उत्पादन दोष त्वरित अपघातास कारणीभूत ठरू शकते.

**पायलटची चूक**

पायलटची चूक हे विमान अपघाताचे एक प्रमुख कारण असू शकते. विशेषतः टेकऑफ दरम्यान जेव्हा पायलट पिच अँगल, वेग आणि रनवे लिफ्ट ऑफ पॉइंटबद्दल चुकीचा निर्णय घेतो. टेकऑफ आणि लँडिंग दरम्यान बहुतेक विमान अपघात मानवी चुकांमुळे होतात.

**खराब हवामान**

विमान अपघातांमध्ये वादळ, जोरदार वारा, कमी दृश्यमानता किंवा टेकऑफ दरम्यान मायक्रोबर्स्ट यासारख्या गोष्टी देखील अपघातांना कारणीभूत ठरतात. अलिकडेच, जेव्हा दिल्लीमध्ये खराब हवामानामुळे वादळ आले होते, तेव्हा एका विमानाचा टरबुलेन्समध्ये अडकल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता.

त्यामुळे खराब हवामानामुळेही अपघात होतात.

**तांत्रिक बिघाड**

टेकऑफ दरम्यान विमान अपघातांमध्ये तांत्रिक बिघाड महत्त्वाची भूमिका बजावतो. बऱ्याचदा विमानाच्या लँडिंग गियर, ऑटोथ्रॉटल सिस्टम, हायड्रॉलिक्स किंवा एअरस्पीड इंडिकेटरमध्ये बिघाड झाल्यामुळे अपघात होऊ शकतो. टेकऑफ आणि लँडिंग दरम्यान कमी वेळ असल्याने, तांत्रिक बिघाड होण्याची शक्यता नसावी, अन्यथा ते धोकादायक ठरू शकते.

***



**'Mayday...Mayday...' या मेसेजचा अर्थ काय?**

अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान आज दुपारी १.१७ वाजता अहमदाबादेत कोसळले. या विमानातील २४२ प्रवाशांचा मृत्यू झाला. विमान कोसळण्यापूर्वी पायलटने एअर ट्रॅफिक कंट्रोल म्हणजेच एटीसीला 'Mayday Mayday' असा मेसेज पाठवला...त्यानंतर विमानाचा संपर्क तुटला... काय आहे या मेसेजचा अर्थ?

'आता आमचे सगळे पर्याय संपले आहेत आणि आम्ही विमान क्रॅश करत आहोत' असा या मेसेजचा अर्थ.

#एयर_इंडिया #ahmedabadnews #planecrash #ahmedabad

5:58 pm

# सहा सरसंघचालक : नेतृत्वाचा मौलीक आलेख

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही जगातील सर्वात मोठी स्वयंदवी संघटना आहे. १९२५-२०२५ या शंभर वर्षात संघाने देशाच्या उभारणीत बजावलेले कार्य अतुलनीय आहे, संघ कार्याचा आढावा घेणारे अनेक छोटे मोठे ग्रंथ उपलब्ध आहेत. तथापि डॉ. वि.ल. धारूरकर यांनी लिहलेल्या आणि पुण्याच्या वरदा प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या सहा सरसंघचालक या ग्रंथाचे स्वागत करताना मला मनस्वी आनंद होत आहे. एकुण १८३ पानांचा अकरा प्रकरणांनी युक्त असा हा ग्रंथ वाचनीय आणि आपल्या ग्रंथालयात संग्रहीत करावा असा आाहे.


प्रस्तुत ग्रंथ कसा उदयास आला, हा ग्रंथ काही मिनिटांचा तासांचा किंवा दिवसांचा प्रवास नाही. तर हा तब्बल शंभर वर्षाचा प्रवास आहे. या ग्रंथाची गौरवगाथा व पार्श्वभुमी समजाऊन घेण्यासाठी आपल्याला लेखकांच्या (लाईक जर्नी) जिवन प्रवास समजावून घ्यावा लागेल. रोम इज नॉट बिल्ट इन अ डे या म्हणी प्रमाणे प्रस्तुत ग्रंथावर लेखकाने वेगवेगळ्या ठिकाणी सर्व सरसंघचालक यांच्यावर भाषणे दिलेत व लेख प्रदर्शित केले आहे. लेखामध्ये व भाषणामध्ये वेळेचे आणि शब्दाचे बंधन, मर्यादा असतात. ती जागा वाचकांची भरून काढण्यासाठी लेखकाने हा ग्रंथ आपल्या हाती सुपूर्द केला आहे. प्रस्तुत ग्रंथातून त्यांच्या विचारांची प्रगल्भता व सादरीकरणाचे सौंदर्य आपल्याला पाहायला मिळते. ती प्रगल्भता लेखकाच्या अंतर्मनातून पाझरते व ती थेट वाचकांच्या मनापर्यंत किंवा हृदयापर्यंत पोहोचते.

या ग्रंथातील बहुतेक लेख आधुनिक केसरी या ऑनलाईन दैनिकातून प्रसिद्ध झाले आहे.

**सहा महानायकांचा गौरव:**

प्रस्तुत ग्रंथात एकूण अकरा प्रकरणे आहेत. पहीली दोन प्रकरणे उष:काल व रा.स्व. संघ हिंदुत्वाचे चैतन्यपर्व ही पुर्वपिठीका सांगणारे आहेत. या प्रकरणामध्ये त्यांनी प्रास्तविक व रा. स्व. संघाची जडण घडण उदयास येत असताना तत्कालीन परिस्थीती, समोरील ध्येय व उद्दिष्ठ्ये, बरोबरच आव्हाने यांची एक सांगड या ग्रंथात पहावयास मिळते.

या प्रास्ताविकेनंतर देणारे तीन ते आठ, ही




पाच प्रकरणे प्रामुख्याने आतापर्यंतचे सहा सरसंघचालक यांच्या परिचय करुन देतात. त्याचबरोबर प्रत्येक महानायकांनी शिवधणुष्य किती समर्थपणे पेलले याची प्रचिती एक वाचक म्हणून आपणास येते. प्रत्येक संघचालकांनी तत्कालीन परिस्थीतीवर मात करुन पुढिल प्रवास किती जोमाने, समर्थपणे उंचीवर नेऊन ठेवला हे लक्षात येते आणि त्या सर्व आव्हानांना त्यांनी किती लिलया पेलले, याचा लेखा जोखा आपल्याला या प्रस्तुत ग्रंथात अभ्यासायला मिळतो.




यापैकी पहिले तीन सरसंघचालक अनुक्रमे प.पु. डॉ. केशव बळीराम हेडगेवार, प.पु. गोळवलकर गुरूजी व प.पु. बाळासाहेब देवरस यांची भुमिका व कर्तृत्वाचा आलेख मांडतात, त्यांची वैचारीक जडण घडण, त्यांच्या दूरदृष्टी व दृष्टीकोनाचा विकास यावर विशेष प्रकाश टाकला आहे.

प्रामुख्याने डॉ. हेडगेवारांची हिंदू राष्ट्र कल्पना, गोळवकलर गुरुजी यांचा सांस्कृतीक राष्ट्रवाद व बाळासाहेब देवरस यांची सामाजिक समरसता आपल्याला अभ्यासायला मिळते.

त्याचबरोबर, डॉ. हेडगेवार हे असे पाहिले समाजशास्त्रज्ञ होते, श्री. गुरुजी यांचे विचार व तत्वज्ञान हे जसे बंच ऑफ थॉटस या पुस्तकावर आधारलेले आहे. याशिवाय देवरसांनी समरसतेचे तत्वज्ञान सांगुन, संघ कसा लोकाभिमुख केला, हे परखड पणे मांडले आहे. या तिन्ही सरसंघचालकांचे तात्वीक योगदान किती भरीव व ठोस असल्याचे आपणास या ग्रंथात दिसुन येते. तदनंतर, प.पु. राजेद्रसिंह, प.पु.के. सुदर्शन व समकालीन सन्मानीय प. पु. मोहनजी भागवत पुर्वीच्या सरसंघचालक यांच्या तुलनेने अगदी अलीकडचा काळ आहे, या तीन महानायकांच्या कार्याचा आलेख आपल्याला त्यांच्या कार्यावर, व भुमिकावर सुद्धा प्रकाश टाकण्यात आला आहे.

विशेषत: प.पु राजेद्रसिह उर्फ रज्जो भैय्या यांनी उत्तर भारतात व गंगा नदीच्या खोऱ्यात संघ कसा प्रस्थापीत केला, तिथे त्यांनी घेतलेली भुमिका व त्यांच्या समोरील तत्कालीन आव्हाने यावर प्रामुख्याने भर दिल्या गेला आहे. ते कसे विज्ञाननिष्ट प्राध्यापक होते याची प्रचिती या प्रकरणातून पटते.

तदनंतर प्रज्ञावत प.पु. के. सुदर्शन यांच्या विचाराने, प्रेरणेने भारताची तरुण पिढी डाव्या विचाराकडे वाळत असताना त्यांनी कसे परत उजव्या विचाराकडे खेचुन आणले. त्यांच्या नेतृत्वाचे हे मॅग्नेटीक मॅजिक कसे होते. त्यांनी संघाला खऱ्या अर्थाने लोकाभिमुख कसे बनवीले याचा संक्षिप्त आलेख मिळतो.

त्याच बरोबर, सध्याचे सन्मानीय सरसंघचालक प.पु. मोहनजी भागवत यांनी घरवापसी सिद्धांत कसा मांडला, संघाला कसे विज्ञाननिष्ठ व प्रगती पथावर आणले. सामाजीक दृष्ट्या पुरोगामी बनवले. याचा संदर्भसहीत आढावा आपल्याला पाहवयास मिळतो. याशिवाय त्यांनी आणलेले सुधारणा पर्व जसे रशियामध्ये पेरेस्त्रोएकाला महत्व आहे तसे मोहनजी भागवत यांच्या रुपाने एक सुधारणा पर्व आले.

**शाश्वत विकासाचा सहभाग :**

शेवटची दोन प्रकरणे नवीन संदर्भासहित संघापुढील आव्हानांची मांडणी करणारी आहेत.

एकूणच संघाच्या वाटचालीच्या आलेख प्रकरण ३ ते ८ पर्यंत सहा सरसंघचालक यांच्या कार्य व कर्तृत्वाचा परिचय करुन देतात. शेवटची दोन प्रकरण शतकोत्तर आव्हाने व संधी या प्रकरणात, संघा समोरील आव्हाने, संघाने कोणती भूमिका घ्यावी.

भविष्यातील आव्हाने व देशाची उभारणी संघाला कशा प्रकारे अपेक्षीत आहे, याचा अभ्यास पहायला मिळतो. शाश्वत विकास प्रकरणात संयुक्त राष्ट्र संघटनेने जी १७ लक्ष सांगीतली, त्यावर आपण कसे काम करीत आहोत. याबद्दलच्या अपेक्षा या प्रकरणात दृष्टीक्षेपात पहावयास मिळतात.

शेवटी उपसंहार या शेवटच्या प्रकरणात वरील सर्व प्रकरणाचा सारांश व गोषवारा दिलेला आहे. अशा प्रकारे ११ प्रकरणात सहा सरसंघचालक यांच्या इंस्पायरींग लिडरशीप स्टोरीज, ज्यांनी आपले नेतृत्व, कर्तृत्व व वकृत्व यावर प्रकाश टाकणारे आहे.

या प्रस्तुत ग्रंथाला एक संशोधनाची बैठक सुद्धा प्राप्त झालेली आहे. या मध्ये प्रत्येक प्रकरणात निवडक संदर्भ पान नंबर सहीत दिलेले आहेत. जर कोणा संशोधकाला वाचकाला या विषयावर किंवा रा.स्व.संघाशी निगडीत विषयावर संशोधन करण्यासाठी हा एक मैलाचा दगड ठरेल. यात शंका नाही.

अशा प्रकारे हा ग्रंथ शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संघकार्याची आणि संघ नेतृत्वाची ओळख करून देणारा एक ऊपयुक्त ग्रंथ आहे. शंभर वर्षाच्या वाटचालीचे लेखकाने घेतलेला आढावा अर्थपुर्ण आहे. सर्व सहा सरसंघचालकांच्या कार्याचे शास्त्रीय विश्लेषण करून समतोल मांडणी केली आहे.

नियोजन, अनुशासन, सेवा व विकास कार्याची शास्त्रीय उपयोजन हा संघाच्या यशाचा आत्मा आहे. संघाची पुढील वाटचाल राष्ट्र ऊभारणीसाठी दिशा दर्शक व प्रेरक आहे.

पुस्तकाचे नाव - सहा सरसंघचालक,
लेखक - प्रा.डॉ. वि. ल. धारूरकर

**साहित्य भारतीतर्फे उद्या दोन पुस्तकांचे प्रकाशन**

छत्रपती संभाजीनगर: साहित्यभारतीच्या वतीने प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर यांच्या 'सहा सरसंघचालक' आणि प्रा. डॉ. रवींद्र बेम्बरे (देगलूर) यांच्या 'नैसर्गिक आपत्तीत मराठी संतांचे मनोविज्ञान' या पुस्तकांचा हा प्रकाशन सोहळा शुक्रवारी दि.१३ जून रोजी होत आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून न्या. अंबादासराव जोशी, मनोजकुमार, उपेंद्र कुलकर्णी, डॉ. बळीराम गायकवाड यांची उपस्थिती तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल भालेराव असतील. हा सोहळा डॉ. हेडगेवार रुग्णालय येथील दामूअण्णा दाते सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता होणार असून 'सहा सरसंघचालक' या पुस्तकावर प्रा. डॉ. कैलास अतकरे हे भाष्य करतील. असे प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, उमेश काळे, नवनाथ पवार यांनी कळवले आहे.







# जात्यावरच्या ओव्या......

उगवले नारायण
मी उगवता देखले
जोडून दोन्ही कर
फुल जाईचे झोकले ||११९||

उगवले नारायण
रूप बाळाचे घेऊन
गेले मावळाया शेर
अवघ्याला देऊन ||१२०||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# पर्यावरणाचे सदिच्छा दूत




ज्योतिर्मय साहित्य


सूर्योदवपूर्वी उठावेच. अनेशापोटी काही व्यायाम वा योगासने करावी. ट्रेडमिलवर व्यायाम करणे त्यांना मंजूर नाही कारण त्यासाठी विनाकारण विजेची नासाडी होती. त्यापेक्षा फिरायला जाणे हा सर्वोत्तम व्यायाम आहे. त्यामुळे निसर्गाचे सान्निध्यही लाभते. दिवसातून एखादा तास तरी थोडा घाम येईपर्यंत काही शारीरिक कष्टाचे काम करावे. त्यामुळे आरोग्य चांगले राहते. झाडं, माती, पालापाचोळा म्हणजे घाण नाही. जे बायो डिग्रेडेबल आहे त्यामुळे रोग होत नाहीत. माती, पालापाचोळा यांना रोज एकदा तरी हात लागलाच पाहिजे. घरात नैसर्गिक खेळती हवा आणि पुरेसा उजेड असावा. पंख्याची गरज भासू नये आणि गरज लागलीच तर अगदी कमीतकमी वापर करावा. ए सी चा वापर तर नकोच. माठातील पाणी प्यावे. फ्रीजचा वापर टाळावा. ताजे अन्न, फळे, भाजीपाला खावा. शक्यतो घरीच जेवावे. बाहेरचे खाऊ नये. प्रवासात जाताना सुद्धा दिलीपदादा आणि पौर्णिमाताई स्टीलचे ग्लास सोबत नेतात. त्यातच ते चहावाल्याकडून चहा घेतात.




चहासाठी कागदी वा प्लास्टिकचे मग वापरून पर्यावरणाची हानी करणे त्यांना मान्य नाही. दुपारी सूर्य डोक्यावर आला की जेवावं आणि संध्याकाळी अंधार पडण्याआधी जेवून घ्यावं. रात्र ही विश्रांतीसाठी आहे. दिसामाजी काहीतरी ते लिहावे या समर्थांच्या उक्तीचं ते पालन करतात. ते म्हणतात गरज आणि हाव यात आपल्याला फरक करता आला पाहिजे. निसर्ग आपल्या गरजा भागवू शकतो पण आपली हाव मात्र तो पुरी करू शकत नाही. आपल्या उत्पादन वाढीच्या आणि हावेच्या लालसेमुळे निसर्गाला आपण ओरबाडतो आहोत. पुढच्या पिढ्यांसाठी आपण काही ठेवणार आहोत की नाही ?

त्यांचं एकंदरीत वागणं आपल्यासारख्या शहरी जीवनमान अंगवळणी पडलेल्या लोकांना विचित्र वाटेल. उपभोगासाठी विविध वस्तूंचा संचय करणाऱ्या आणि त्यासाठी भरमसाठ पैसा खर्च करणाऱ्या आपल्यासारख्यांना त्यांची जीवनशैली पचनी पडणार नाही. पण हे लक्षात घ्यायलाच हवे की हे दोघे उच्चशिक्षित आहेत. केवळ मी पर्यावरणस्नेही वागून असा कितीसा फरक पडणार आहे असा विचार त्यांनी केला नाही. त्यांनी सुरुवात स्वतःपासून केली. गांधीजींचे फोटो लावून व्यासपीठावर त्यांच्यावर बोलणाऱ्या आपल्यासारख्या लोकांपेक्षा गांधीजींच्या तत्वांचे खरे अनुकरण या दोघांनी केले आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

या दोघांची आध्यात्माची बैठकही पक्की आहे. विचारांची बैठक पक्की आहे. एकदा ठरवले की ते निर्धाराने करतात. गेली पंचवीस वर्षे ते ही जीवनशैली जगत आहेत.अनेक मंडळी आवर्जून त्यांचं घर, त्यांची जीवनशैली पाहायला जातात. अशा व्यक्तींचंही ते स्वागत करतात. त्यांचे स्वप्नामधील गावा हे पुस्तक त्यांना असे जीवन जगताना आलेले अनुभव आपल्याला सांगते. *थेंबांनी जर भरते घागर, का उधळावा उगाच सागर* ? हे त्यांचे तत्वज्ञान आपणही एकदा जरूर विचार करावा असे आहे.




दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# पादसेवन भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

संपूर्ण आयुष्यात देहासकट सर्व दिसणारे, विनाशी

वस्तुंचा समुदाय यामध्ये आपण जगतो रस घेतो, आणि शेवटी असमाधानात मरतो. शांती मिळवण्यासाठी या कालचक्रातून बाहेर पडण्यासाठी मार्गदर्शन तर हवे असते आता हे मार्गदर्शन तुम्हाला संतांच्या कडूनच होते. ते तुम्हाला आत्मसाक्षात्कार करून देतात. परमात्म वस्तु दाखवतात. सत्यकाय, असत्यकाय, ग्राह्य काय, अग्राह्य काय या सगळ्या गोष्टींचा समजावून सांगतात त्यांच्या कडून समजून घेतल्यामुळे परमात्मा मनात एकरूप होतो. आणि आपण त्याच्या चरणाचे दास होतो.

आपल्या संत साहित्यात एक एक शब्द म्हणजे अनेक रत्नांचे डोंगर आहेत. अथांग ज्ञान सागराचा जलस्त्रोत आहे. जे कधीही आटत नाही. फक्त त्याच्याकडे बघण्याची आपली क्षमता हवी. आणि हे भगवंताचे दास्य होण्याची पात्रता आपल्या ठायी यावी यासाठी संतसाहित्याचे विचार परत परत वाचणे आणि आपल्या जगण्याच्या जीवन शैलीत आमलात आणणे गरजेचे आहे.

अनुभव घेता संगत्याग नसे। संगत्यागे अनुभव न दिसे।
अनुभवीयासीच भासे येरां गथागोवी।


सातव्या ओवीत समर्थानी संगत्याग सांगितला आहे तो कसा ते आपण पाहूया.

१)संगत्याग – संग शब्द संज या धातूपासून बनला आहे. संज म्हणजे चिकटणे संगत्याग म्हणजे एका भगवंतावाचून मन कोणत्याही वस्तूला न चिकटणे.

संगत्याग निवेदन म्हणजे देवाला मी पण अर्पण करणे. परमात्म वस्तु अत्यंत सुक्ष्म आहे. बुद्धी, मन, इंद्रिये यांच्या द्वारे जीव द्रुश्याला चिकटत असल्याने ते सुटल्या शिवाय आत्मस्वरूपाचा अनुभव येत नाही.

(क्रमशः)

# नाम हाच भगवंताचा अवतार



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आजच्या युगात नाम हाच भगवंताचा अवतार आहे. ''सुष्टांचे रक्षण आणि दुष्टांचा नाश करण्याकरिता मी अवतार घेतो'' असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे; त्यावरून असे ठरते की सुष्ट आणि दुष्ट या दोघांचेही अस्तित्व असून, त्यांत दुष्टांकडून सुष्टांना त्रास होण्यातच भगवंताच्या अवताराची उत्पत्ती आहे.

आजकाल पाहू गेले तर असे दिसते की, सुष्टांचे अस्तित्वच जवळजवळ दुर्मिळ झाले आहे. म्हणजे, ज्यांचा छळ झाला असता भगवंताने अवतार घ्यावा, ते सुष्टच नामशेष झाले आहेत. मग अवतार तरी कुणासाठी, कसा व्हावा ? याचा अर्थ, अवतार होणारच नाही असे नाही; पण वस्तुस्थिती काय आहे ते यावरून आपल्याला समजेल. आजची परिस्थिती आणि पूर्वीच्या काळची परिस्थिती यांत फरक आहे. पूर्वी सद्वासना जिवंत होती, पण ती उघडपणे कृतीत आणणे कठीण होते. आता सद्वासनाच नाहीशी झाली आहे, म्हणजे पायाच ढासळला आहे, तिथे कृतीचा प्रश्नच उदभवत नाही. पूर्वी सद्वासना सूक्ष्मपणे का होईना जिवंत होती, पण स्थूल प्रकट कृती दुर्घट झाली होती; त्या वेळी भगवंताला स्थूलात येऊन कार्य करणेच जरूर होते, आणि अशा वेळी अवतार घेऊन, म्हणजे सगुण रूप धारण करून, भगवंताने कार्य केलेही. आताचा प्रश्न, दुर्वासना जाऊन सद्वासना कशी उत्पन्न होईल हा आहे; म्हणजेच कार्य सूक्ष्मातले आहे. म्हणजे जसा रोग तसे औषध किंवा काटयाने काटा काढावा या न्यायाने, उपाययोजना सूक्ष्मातच केली पाहिजे. वासना बदलायला वासनेइतकाच जबरदस्त इलाज पाहिजे; आणि तो म्हणजे भगवंताचे नाम. चालू परिस्थितीशी झगडून मार्ग काढून देणारा असा जर कोणता अवतार असेल तर तो भगवंताच्या नामाचाच आहे, आणि त्याकरिता सर्वांनी भगवंताच्या नामाचा टाहो फोडणेच जरूर आहे. हे कार्य भगवंताने सगुणरूप धारण करून होणे कठीण आहे; ज्या अर्थी कारण सूक्ष्मातले आहे त्या अर्थी त्याला इलाजही सूक्ष्मांतला पाहिजे, म्हणून नामावताराची आज गरज आहे. प्रत्येक नामागणिक त्याचा अवतार आहे, आणि त्याची कास धरणे, म्हणजेच नाम घेणे, हे आमचे आजचे मुख्य कर्तव्य आहे. तेवढे केले की नाम आपले अवतारकार्य करून दाखवील. आपण आपले प्रेम प्रपंचाकडे लावले आहे, ते नामाकडे लावावे, म्हणजे नामस्मरणात फार आनंद येईल. मनाला नामाची चटक लागली आणि नामाच्या प्रेमातच मन रंगून गेले म्हणजे जन्म सफल झाला.

नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही.

## || संत महात्म्य ||

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# महात्म्यांचा अविर्भाव

ज्योतिर्मय साहित्य

बऱ्याचदा अपुरी माहिती असणे,अहंकार फोफावलेल्या असणे, भक्तीचा अभाव आणि विकारांचा प्रभाव या मुळे या अति विशिष्ठ देवतांचा आपल्या कडून अनादर होतो, उपमर्द होतो हे ध्यानी घेऊन त्यांची अनन्य भावाने क्षमा याचना करून श्री कृष्ण व श्री राधा राणी यांच्या विमल चरणावर शरणागत भावाने कोटी कोटी वेळा वंदन करुयात.

जय जय श्री राधे,जय कुंज विहारी !

गो लोक सुंदरी, भगवती, महामाया श्री राधा राणी यांच्या सेवे साठी त्यांच्या अष्ट सख्या या भूतलावर अवतीर्ण झाल्या होत्या त्यांची चरित्रे आपण पाहत आहोत. अष्ट सखी पैकी दुसरी सखी विशाखा राणी हिचे चरित्र आज आपण पाहूयात.

विशाखा :

विशाखा ही श्री राधा व कृष्ण या युगला सेवेत सदैव तत्पर असणारी सखी होती. राधा राणीला वस्त्र आणि अलंकार देणे, त्याची निवड करणे, आणि उतरलेली वस्त्रे व्यवस्थित ठेवणे, ही कामे विशाखा करीत असे. विशाखाच्या वडिलांचे नाव पवन आणि आईचे नाव वहीका होते. सुगंधी द्रव्याचे युगल जोडीस उत्तम उत्तम चंदन लेप लावणे,त्यांचे सन्निध धूप लावणे, सुगंधी द्रव्य यांचे लेप लावणे ही कामे ती करी. राधा राणी साठी सुंदर मेहंदी चे नक्षीकाम काढणे हे तिचे काम होते. ही राधा राणीस हिताच्या गोष्टी सांगे,ही अत्यंत बुद्धिमान अशी विशाखा होती. विजे सारखी चमकणारी लख लखित अशी तिची अंग कांती होती. एकदा श्रीकृष्णाची मुरली धून वाजत असताना राधा काजळ घालत होती. एकाच डोळ्यात काजळ रेखल्यावर तिला रहावले नाही आणि ती कृष्णाकडे धावत गेली. भगवान श्रीकृष्णाने पाहिले की राधा फक्त एकाच डोळ्यात काजळ रेखून आली आहे. त्यांनी आपली अंगठी एका दगडावर घासली आणि ते काजळ राधेच्या दुसऱ्या डोळ्यात घातले. डोळ्यात अंजन घातले म्हणून या गावाचे नाव अंजनौक असे पडले. हेच विशाखाचे गाव आहे. विशाखाचे वय हे राधे एवढेच होते. आजही तिच्या गावी विशाखा या सखीचे मंदिर बांधले आहे. विशाखा हीच कलियुगात स्वामी हरिराम व्यास या नावाने अवतरीत झाली.

विनम्र भाव, प्रभूचे अक्षुन्न स्मरण, निर्याचक भक्ती आणि समर्पण या भावांनी या सख्या सर्वोच्च स्थान प्राप्त करू शकल्या.

आपल्या सारख्या लोकांना त्यांच्या चरित्रातून योग्य ते मार्गदर्शन मिळो ही युगल चरणी विनम्र प्रार्थना!

राधे राधे!

परममंगल महालक्ष्मी श्री राधेची तिसऱ्या क्रमांकाची सखी चित्रा राणी हिच्या विषयी आज आपण अधिक माहिती घेऊ.

३) चित्रा

चित्राही युगल जोडीच्या भक्तीत आकंठ बुडलेली अशी सखी होती. हिला पिवळे वस्त्र नेसायला खूप आवडायचे. राधा रानी आणि भगवान श्रीकृष्ण यांना फळे, शरबत देणे, त्यांची सेवा करणे. युगल जोडीचा शृंगार करणे, ही कामे ती करायची. भगवती स्वरूपा चित्रा या सखीचा रंग केशरा सारखा होता. ही ब्रह्मांचल पर्वतावर चीतोली या गावी राहायची. तिच्यात करुणा भाव हा अत्यंत ओतप्रोत पणे भरलेला होता.ती अतिशय बुद्धिमान होती आणि ती सांकेतिक भाषा तज्ञ होती. तिला विविध भाषेचे ज्ञान होते. चित्राच्या आईचे नाव कारसिका आणि वडील कटुरा होते. चित्रा ही राधे पेक्षा २६ दिवसाने मोठी होती. संगीताची कुशल जाणकार, तज्ञ, साहित्य, शास्त्र याची पंडित, पशुपालन, पशुची रोग चिकित्सा यांची विशेषज्ञ होती. ती शेती तज्ञ होती बागकाम, फुलांची सजावट हे तिच्या आवडीचे विषय होते. हिचे गाव चिकासौली आहे. भगवती स्वरूपा चित्रा देवीचे मंदिर याच गावी आहे. प्रत्यक्ष परमात्म्याची सेवा तर करण्याचे न आपणास भाग्य आहे ना आपली तेवढी पात्रता.जगतगुरु तुकाराम महाराज म्हणतात तुमच्या दासाचाही दास मज करोनी ठेवा. जेंव्हा तुकाराम महाराज असे म्हणत असतील तेंव्हा तर आपली दासाचे दास होण्याचीही लायकी नक्कीच नाही.म्हणून निदान अनन्य भावाने आपण या महात्म्यांची क्षमा याचना करून त्यांचे चरणी विनम्र तरी होउयात.

जय जय श्री राधे, जय कुंज विहारी !

## || निरूपण ||



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यममृतवृष्टिहेतवे।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं विषप्रभावनाशिनि।। २० ।।**

अमृतवृष्टीसाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. विषाचा प्रभाव विनष्ट करणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यमनुपमे मनोरमे।**
**नमस्तेऽस्तु महामाये मनसः शान्तिहेतवे।। २१ ।।**

हे अनुपमे, मनोरमे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. मनाच्या शांतीसाठी महामाये, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कल्याणकर्त्रिते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मन्मानसे स्थिते नमः।। २२ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. कल्याण करणारे तुला नमस्कार असो. माझ्या मनामध्ये स्थित, जगदंबिके, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कृपाकर्त्रि नमो नमः।**
**नमस्तुभ्यं जगन्मातः परशुराममातृके।। २३ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. कृपा करणारे तुला नमस्कार असो. हेजगज्जननी, परशुरामाचे आई, तुलानमस्कार असो.



## आरोग्य संजीवनी

# उपाशी पोटी काळे मनुके खा, हृदय विकार टाळा

ज्योतिर्मय साहित्य

काळी द्राक्षे ही आयुर्वेदानुसार औषधी व श्रेष्ठ मानली जातात. काळी द्राक्षे प्रक्रिया करून वाळवून त्याच्या मनुका तयार केल्या जातात. काळे मनुकेही अनेक पोषक घटकांनी युक्त असतात.

हे काळे मनुके उपाशी पोटी खाण्याचे अनेक फायदे आहेत. त्यातील सर्वात मोठा फायदा म्हणजे काळे मनुके नियमित खाल्ल्याने हृदय विकारापासून मुक्तता मिळवता येते.

काळ्या मनुक्यात एन्थोकाइनिन्स (), पॉलीफेनॉल, अँटिऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन-सी, गामा-लिनोलेनिक एसिड (), पोटशियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस असे अनेक पोषक घटक असतात. काळ्या मनुक्यांमुळे रक्त प्रवाह वाढतो, रोगप्रतिकार शक्ती वाढते. तसेच काळे मनुके हे हृदय, डोळे आणि किडनीच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

जाणून घ्या फायदे...

१) हृदय विकाराचा धोका कमी करते

काळ्या मनुक्यात हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त असणाऱ्या पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते. पोटॅशियम हृदयाला बळ देते व हृदय विकारांचे प्रमाण कमी करते. याशिवाय काळ्या मनुकात असणाऱ्या ह्या घटकामुळे रक्ताचा प्रवाह व्यवस्थित होतो, रक्तात गुठळ्या होत नाही, रक्तदाब नियंत्रित राहतो आणि रक्तातील वाईट कोलेस्टेरॉल कमी होत असल्याने काळ्या मनुकामुळे हृद्यविकाराचा धोका कमी होण्यास मदत होते.

२) रक्तदाब नियंत्रित ठेवते

काळ्या मनुकात पोटॅशियम आणि चे प्रमाण जास्त असते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. दररोज काळ्या मनुका खाण्यामुळे रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत होते. हाय ब्लडप्रेशरमुळे हार्ट अटॅक, स्ट्रोक (पक्षाघात) आणि किडन्या निकामी होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ब्लडप्रेशर कंट्रोलमध्ये ठेवणे आवश्यक असते.

३) हिमोग्लोबिन व रक्त वाढवते

काळ्या मनुक्यात लोह व इतर जीवनसत्वे मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे रक्तातील हिमोग्लोबिन वाढण्यास मदत होते. यासाठी १० ते १२ काळ्या मनुका वाटीभर पाण्यात भिजत घालून त्यात थोडासा लिंबूरस घालावा. दुसऱ्या दिवशी सकाळी भिजलेले मनुके चावून खावेत. यामुळे रक्तारील हिमोग्लोबिन वाढते त्याचबरोबर रक्त शुद्ध होते आणि रक्ताचे प्रमाणही वाढते.

४) डोळ्यांचे आरोग्य सुधारते

काळ्या मनुकामध्ये डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त असणारे आणि हे घटक असतात. त्यामुळे डोळ्यांची दृष्टी निरोगी राहण्यास मदत होते. याशिवाय यामुळे रेटिनामध्ये ऑक्सिडेटिव्ह डॅमेज होत नाही त्यामुळे अकाली अंधत्व येण्यापासून बचाव होतो.

५) डायबेटीससाठी उत्तम

काळ्या मनुकातील हा घटक डायबेटीसमध्ये उपयुक्त ठरतो. यामुळे रक्तातील साखर आटोक्यात राहण्यास मदत होते. शिवाय काळ्या मनुकांचा ७० पेक्षाही कमी असल्यामुळे ते मधुमेही रुग्णांसाठी योग्य ठरतात.

६) अशक्तपणा दूर होतो

दररोज सकाळी भिजलेले काळे मनुका खाल्ल्यामुळे अशक्तपणा दूर होण्यास मदत होते. यामध्ये व्हिटॅमिन-, व्हिटॅमिन-, व्हिटॅमिन-, विविध मिनरल्स यासारखे अनेक पोषकघटक असल्याने रोग प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

(क्रमशः)

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## || श्री राम कथा ||




वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

खरे वैराग्य संतांजवळ असते कारण ते विवेकातून आलेले असते. स्माशनातून येताना वैराग्य येते.मैथुन नंतर ही ते येते. हे क्षण भंगूर असते. ज्यावेळी अंतःकरण मन बुद्धी ढळते त्या वेळी हे विचार वैराग्य आठवायला हवे. उत्तम वैराग्य विवेकातून येते.विवेक संतांजवळ असते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका.. यातही हे स्पष्ट होते. मनाच्या उपशमाचा विचार वशिष्ठानी सांगितला. मनाला देवाचा चरणी समर्पित करणे. त्यास आवरता यायला हवे. आपले मन कोठे धावू नये, मन स्थिर असावे या मनोनाश करणे गरजेचे असते..सरूप, अरूप मनोनाश असे दोन प्रकार आहेत.मनाला शांत,निश्पंद करायचे तर ज्ञानाने, संत संगती,योग,प्राणायाम या द्वारे करावे.माणसाचे जीवनाचे अधिष्ठान हे विचाराचे आहे. रणांगणात गीतेचा उपदेश देताना कृष्ण व अर्जुन हे कसे होते तर अस्थिर मनाचा कृष्ण म्हणजे अर्जुन, आणि स्थिर मनाचा अर्जुन म्हणजे कृष्ण. या दोघात देहाच्या शिवाय अन्य फारसा फरक नव्हताच. मनाच्या बोधा साठी संत वांगमय असते. विश्वामित्र सोबत राम व लक्ष्मण सोबत गेली. विश्वामित्रांनी रामास अनेक अस्त्रे दिली,शस्त्रे दिली जी भगवान शंकराकडून मिळविली होती. अस्त्रे मंत्र सामर्थ्यावर अवलंबून होते. विश्वामित्रांनी रामचंद्र प्रभूला ज्ञानसंपन्न केले. वसिष्ठानी प्रभु रामास ज्ञान दिले तर विश्वामित्रांनी त्यांना कर्माचे अधिष्ठान दिले. कर्माला निर्दोष ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञान आंधळे व कर्म दूषित हे उपयुक्त नाही. दोन्हीं असावेत. जीवनाची धन्यता ज्ञानाने होतेच, पण कर्मनिष्ठता नसेल तर जीवन निरर्थक होईल. (क्रमशः)


# क्षितिजगामी : एक प्रवास अपराजित जिद्दीचा

**ज्योतिर्मय साहित्य**


नीताच्या पुनर्जन्माची कहाणी - जेव्हा एखाद्या व्यक्तीकडे सांगण्यासारखी अनोखी कहाणी असते आणि ती सांगण्याची शैलीही वैशिष्ट्यपूर्ण असते, तेव्हाच त्यांचे लेखन वाचनीय ठरते. नीता चापले यांचे ''क्षितिजगामी'' हे पुस्तक असेच आहे. ''एक प्रवास अपराजित जिद्दीचा'' हे उपशीर्षक या पुस्तकाचे अचूक वर्णन करते. या उपशीर्षकातून नीता चापले यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या आजवरच्या प्रवासाचे चित्र उभे राहते.आत्मकथन लोक का लिहितात? हा साहित्यशास्त्रातील एक गहन प्रश्न आहे. पण जेव्हा लेखकाचे मन पाण्यासारखे पारदर्शी आणि कारंजासारखे क्षणोक्षणी उसळणारे उत्साही असते, तेव्हा त्याचे आत्मकथन निश्चितच श्रेष्ठ ठरते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ''क्षितिजगामी'' हे पुस्तक.

नीता चापले या भारतातील एक उत्कृष्ट क्रिकेटपटू आहेत. या क्षेत्रात त्यांनी भरपूर मान-सन्मान मिळवला. त्यांनी मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने केले, आपल्या संघाचे नेतृत्व केले आणि अनेक विद्यार्थ्यांना घडवले. मुला मुलींकरिता त्यांनी मुंबईत अकादमी सुरू केली. नागपूर-विदर्भातील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगी चाकोरीबाहेरच्या क्षेत्रात इतकी भरारी घेते, ही तिच्या कुटुंबासाठी जितकी कौतुकास्पद गोष्ट आहे, तितकीच ती सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची आहे, कारण त्या अभावग्रस्त समाजघटकातून आल्या. ज्या काळात त्यांनी शिक्षण घेतले, तो काळ आणि त्यांची कौटुंबिक परिस्थिती मैदानी खेळांसाठी अजिबात अनुकूल नव्हती. पण मनातील जिद्द आणि सतत उत्साही वृत्ती यांच्या बळावर त्यांनी घेतलेली झेप अविश्वसनीय आहे. कदाचित आजच्या पिढीला त्या काळाची बंधने आणि तो रडत-पडत-उठत केलेला प्रवास समजणार नाही. पण ''क्षितिजगामी'' या पुस्तकाची खरी ताकद हीच आहे हे आव्हान पेलण्याची. माझ्या मते, या कसोटीवर हे आत्मकथन अव्वल दर्जाचे ठरले आहे.

क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर नीता चापले (भोयर) थांबल्या नाहीत. त्यांनी वेटलिफ्टिंग आणि स्विमिंगच्या माध्यमातून आपली खेळाची कारकीर्द सुरू ठेवली. वयाच्या पन्नाशीनंतर त्यासाठी लागणारे धाडस आणि जिद्द त्यांच्याकडे होती. तो सगळा प्रवास आजही सामान्य कुटुंबातील स्त्रियांना आणि विशेषतः मुलींना खरोखरच प्रेरणादायक आहे. त्यांना त्यांच्या आयुष्यात



सगळ्याच गोष्टी सहजासहजी मिळाल्या असे नाही. त्यासाठी त्यांना कधी कौटुंबिक, तर कधी संस्थात्मक पातळीवर संघर्ष करावा लागला. पायरीपायरीवर येणाऱ्या अडथळ्यांवर मात करीत आपल्या मनाची उभारी कशी टिकवून ठेवावी, याचे उत्तम उदाहरण नीता चापले (भोयर) यांचे आयुष्य आहे. एकदा कौटुंबिक-सामाजिक पातळीवरील प्रश्नांशी आणि सरकारी संस्थांच्या अडथळ्यांच्या शर्यतीशी तुम्ही दोन हात कराल, पण नियतीचे काय? नियतीनेसुद्धा नीता चापले यांच्यापुढे अनेकदा अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न उभे करून त्यांच्या जिद्दीची परीक्षा घेतली. त्यांच्यासारखीच खळाळत्या उत्साहाची मूर्ती असलेली त्यांची सतरा वर्षांची मुलगी ऐश्वर्या एका अपघातात काळाने हिरावून घेतली. किती मोठा आघात होता तो त्यांच्या कुटुंबावर, घरावर आणि त्यांच्या भावविश्वावर! पण किती दिवस शोक करणार? वर्षभरानंतर नीता चापले दुःखाच्या पॅव्हेलियनबाहेर पडतात आणि आपल्या पुढच्या इनिंगची सुरुवात करतात. जगाला त्यांचे नव्या उत्साहाने भरलेले, आणखी वेगळे रूप पाहायला मिळते, जे या पुस्तकाच्या शब्दाशब्दांतून दिसते. हे पुस्तक म्हणजे ऐश्वर्याच्या मृत्यूने झालेल्या दुःखाचा कोष झुगारून बाहेर पडलेल्या नीताच्या पुनर्जन्माची कहाणी आहे. एकही दिवस उसंत न घेता, सतत नवनवीन खेळ, नवनवीन जिम आणि नवनवीन मैत्रिणी यामुळे नीता भोयर यांचे पुढचे आयुष्य म्हणजे उत्साह आणि आनंदाची एक सफरच आहे. 'क्षितिजगामी' या पुस्तकाच्या पानापानांवर वाचकांना या सफरीचा अनुभव येतो. या पुस्तकाचा एक विशेष म्हणजे लेखिकेची अकृत्रिम, सहज भाषा. कोणताही आव न आणता किंवा लपवाछपवी न करता नीता भोयर यांनी आपल्या अगदी जवळच्या मित्राच्या मैफलीत गोष्ट सांगावी, तसे कथन केले आहे. त्यामुळे ते प्रत्येक वाचकाला जवळचे वाटते. लेखिका आपल्या कानात आपल्या मनातील गूज सांगत आहे, असे खासगीपणही या शैलीत आहे.



**प्रस्तावना**
डॉ. प्रमोद मुनघाटे
सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली
आणि म. रा. साहित्य व संस्कृती
मंडळ, मुंबई.

लिहिणाऱ्यावर त्यांच्या भोवतालच्या प्रतिष्ठित लेखकांच्या वलयाचे दडपण असते. त्यातून मग लेखकाच्या लेखनातील संकोच किंवा न्यूनगंड उघड होतो. पण नीता चापले (भोयर) यांचे व्यक्तिमत्त्वच इतके पारदर्शी आणि मुक्त आहे, की संकोच किंवा न्यूनगंड हे शब्दही त्यांच्या मनाला कधी शिवत नाहीत. त्याचेच प्रतिबिंब या पुस्तकात दिसते.या पुस्तकाची भाषा हे आणखी एक वेगळे वैशिष्ट्य आहे. बालपणीच्या आठवणी लिहिताना लेखिकेने त्या काळातील बहुजन समाजात बोलली जाणारी भाषा वापरली आहे. त्यामुळे तो काळच जिवंत होत नाही, तर ती माणसे, आजी-आजोबा, काका-मावश्या सगळे डोळ्यांसमोर येतात. पुढे प्रवासात मित्रांच्या घरी भेटीगाठी घेताना, वेगवेगळ्या सामाजिक-आर्थिक स्तरांतील आणि भाषिक समूहांमध्ये वावरताना, त्या त्या ठिकाणच्या बोलीभाषेचा वापर केला आहे. त्यामुळे त्या भेटींचे वर्णन जिवंत झाले आहे. एखाद्या परिटघडीच्या पोशाखी भाषेत त्यांनी त्या घटना लिहिल्या असत्या, तर त्या अगदीच औपचारिक झाल्या असत्या. पण कोणत्याही प्रकारची औपचारिकता नसणे, हीच नीता चापले (भोयर) यांच्या व्यक्तिमत्त्वाची पूर्व-अट आहे. त्यामुळे काही पूर्वग्रह ठेवून एखाद्याने 'क्षितिजगामी' हे पुस्तक वाचायला घेतले, तर त्याला आश्चर्याच्या धक्क्यावर धक्के बसत जातील. असे धक्के देणारे लेखन मराठीत अलीकडच्या काळात दुर्मीळच आहे. म्हणूनच 'क्षितिजगामी' म्हणजे वाचकांना एका व्यक्तिमत्त्वाचा दुर्मीळ अनुभव आहे, असे मी म्हणेन. लेखिकेला खूप खूप शुभेच्छा.

***

# फुलमाला....





गोकर्ण फुल

विविध रंगी गोकर्ण,
विष्णुकांता हिचे नाव.
सुबक सुंदर रूपाने,
मनाचा घेते सहज ठाव.

निळी गोकर्ण विष्णूस वाहता,
सुख समृद्धी येते घरी.
बहरलेली वेल पाहता,
समाधान वाटेच अंतरी.

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

रात्र गंभीर गंभीर होत चाललेली असते. मुलांचे गाणेही थांबलेले असते. गुडूप अंधार पडलेला असतो. दूर दूर गावातील रस्त्यातून एखाद दुसरा दिवा क्वचित मधून मधून लुकलुकत असतो. पुढे तेही दिवे रस्त्यातून जायचे बंद होतात. आकाशातील ताऱ्यांच्या प्रकाशाशिवाय कुठेही प्रकाश नाही दिसत. मला झोप येऊ लागते. ती येऊ लागली की मी हळूहळू उठतो आणि झोपायला जातो. नंतर बऱ्याच वेळाने केव्हातरी पूर्वेकडील दरवाज्यातून दिसणारे आकाश अंधार फिकट होत जाऊन हळूहळू उजळू लागते. जवळपासच्या झाडात एखाद दुसरी सारिका खसपस करीत असते. ढगांवर सोनेरी छटा उमटू लागते. थोड्याच वेळात साडेचारच्या घंटेचे टोल ऐकू येऊ लागतात. मी उठून पूर्वेकडील गच्चीतील दगडी चौरंगावर आसन पसरून उपासनेला बसतो. सूर्य हळूहळू वर येऊन आपल्या प्रकाशाच्या स्पर्शाने मला आशीर्वाद देतो. आजकाल अगदी सकाळीच मला न्याहरीला बसावे लागते. कारण साडेसहा वाजता आश्रमातील सर्व बालक मंडळी विद्यालयाच्या समोरील मैदानावर एकत्र होते.

तेथे कोणते ना कोणते गाणे म्हटल्यानंतर विद्यालयाचे काम सुरू होते. पहिल्या घंटेला मला वर्ग नसतो. पण त्या वेळात मी माझ्या खोलीत जाऊन शिकवायची पुस्तकं आणि टिपणही नजरे खालून घालतो. मग माझे काम सुरू होते. दिवस-रात्र चालणाऱ्या माझ्या कामाचा हिशेब मी तुला दिला. किती शांतपणे दिवस जातो माझा ! मुलांसाठी हे असे काम करणे मला खूप आवडते. मी त्यांच्यासाठी हे जे काम करतो त्याला काही मोल आहे याची त्यांना कल्पना नाही. सूर्याच्या प्रकाशाचा फायदा अनायासे ती जशी घेत असतात, तशीच ती आमच्या सेवेचा फायदा घेत आहेत. पुढे ही मुले जेव्हा मोठी होतील, तेव्हा मग त्यांना येथील एक एक गोष्ट आठवू लागेल. येथील आकाशातील विपुल प्रकाश, इथे वाहणारे खुले वारे आणि सकाळी आणि संध्याकाळी झाडाखाली बसून शांतपणे देवीला केले जाणारे नमन सारे आठवेल.''

सत्येंद्रनाथ टागोर हे रवींद्रनाथांचे वडीलबंधू. ते आपल्या सेवाकाळात महाराष्ट्रात जिल्हाधिकारी आणि जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. इंदिरादेवी ही त्यांची मुलगी. १८८५ ते १८९५ या दहा वर्षांच्या कालखंडात त्यांनी तिला अनेक पत्रे लिहिली. या काळात ते तेव्हाच्या पूर्व बंगालमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये असलेल्या आपल्या इस्टेटची देखरेख करण्यासाठी पद्मा नदीवर असलेल्या पद्मा नावाच्या बोटीमध्ये राहात आणि प्रवास करत. तेथूनच त्यांनी आपल्या महाराष्ट्रात असलेल्या या पुतणीला पत्रे लिहिली. ही सगळे पत्रे इंदिरादेवींनी जपून ठेवली आणि नंतर आपल्या स्वतःच्या हस्ताक्षरात ती लिहून काढली आणि आपल्या काकांना म्हणजेच रवींद्रनाथांना ती भेट दिली. रवींद्रनाथांनी या पुस्तकाला या पत्रांवर भाषेच्या दृष्टीने काही संस्कार करून ती पत्रे सामान्य वाचकांसाठी प्रकाशित केली. या पत्रांमधील काही कौटुंबिक उल्लेख गाळून टाकले आहेत. त्याचप्रमाणे भाषेच्या दृष्टीनेही काही पत्रांचे पुनर्लेखन केले असल्यामुळे या पत्रांना छिन्नपत्रे असे म्हटले जाते. यातील जवळपास प्रत्येक पत्रातून त्यांचे निसर्गप्रेम व्यक्त झाले आहे.

शिलाईदह येथून १७ जून १८९२ या दिवशी इंदिरेला लिहिलेले एक सुंदर पत्र आपण इथे पाहू या. पत्रातून त्यांच्यातील निसर्गप्रेमी तर दिसतोच पण तो निसर्ग त्यांना कशाप्रकारे प्रेरणा देत होता आणि त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करीत होता हेही आपल्याला बघायला मिळतं. आपल्यासाठी देखील हे पत्र खूप मार्गदर्शक आहे असं मला वाटतं.

प्रिय इंदिरा, आजकाल मी संध्याकाळच्या सुमाराला किनाऱ्यावर उतरून बराच वेळ फिरतो. पूर्वेला वळल्यावर एक सुंदर दृश्य दिसतं. पश्चिमेला वळल्यावर दुसऱ्या प्रकारचं दृश्य दिसतं. आकाशातून माझ्या माथ्यावर जणू सांत्वनाची वृष्टी होत राहते. माझ्या दोन्ही डोळ्यांमधून स्वर्गमय मांगल्याची एक धारा माझ्या अंतरंगात प्रवेश करत असते. या वाऱ्यात, आकाशात आणि प्रकाशात प्रतिक्षणी माझ्या मनातून जणू नवीन पालवी फुटते. मी नवीन प्राणाने आणि बलाने परिपूर्ण होऊन जातो. संसारातील सगळी काम करणं आणि लोकांशी व्यवहार करणं मला आता अगदी सहज वाटतं. खरंतर सगळंच सोपं असतं. एकच सरळ रस्ता असतो. तोच धरून चाललं की झालं. नाना प्रकारचे शॉर्टकट्स डोकं लढवून शोधण्याची मला गरज वाटत नाही. सुखदुःखं सगळ्याच मार्गांवरती असतात. कुठल्याही मार्गावर त्यांना टाळण्याचा उपाय नसतो. पण शांती केवळ या मोठ्या रस्त्यावरच असते.

(क्रमशः)

# मोरा गोरा रंग लैलै....

**ज्योतिर्मय साहित्य**

द्रौपदीच्या शरीराला फार मोहक सुगंध यायचा म्हणतात.. तो दूरदूरवर दरवळत असे... नुतनच्याही तळहाताला सतत चंदनाचा वास येत असे.. अगदी हात धुतले तरीही.. हे कुणाच्या नशीबात असत? कीरकोळ चुक हातातून घडल्यामुळे परमेश्वराने एखादा दैवी जीव प्रुथ्वीतलावर मानवी जीवन जगायला पाठवला असेल का नुतनच्या रुपात?

कुमारसेन समर्थ आणि शोभना समर्थ यांची नुतन थोरली लेक.. धाकटी तनुजा.. मुळात वंशपरंपरागत ज्या घरात सौंदर्याने आपला मुक्काम ठोकला होता तीथे नुतन सुंदर असण काही फारस आश्चर्यकारक नव्हत... पण नुतनच सौंदर्य एखाद्या शांतपणे तेवणार्या समयी सारख होत कींवा प्राजक्ताच्या ताज्या फुलासारख होत.. पवित्र,सुगंधी आणि समर्पीत.. तनुजा मात्र अगदी आईसारखी होती..वास्तवात जगणारी, फुलपाखरासारखी भीरभीरणारी अल्लड...

नुतनच्या चित्रपटांबद्दल आणि तीच्या अभिनया बद्दल बोलायची गरज आहे का? शोभना समर्थ यांनीच दिग्दर्शीत केलेल्या ''हमारी बेटी'' मधुन ती चित्रपटसृष्टीत आली आणि उत्तरोत्तर उत्तम अभिनय करत काही भुमीकांवर तीने कायमची आपली मोहोर उमटवली पण तरी सतत जाणवायच की हे सर्व करण्यासाठी तीचा जन्म नाहीच.. आपली बायको, आई म्हणुन असलेली कर्तव्य पार पाडत चित्रपट करत असतानाही तीने कधी तीथली माती अंगाला लावून घेतली नाही..अलीप्त वाटायची ती..

तीचा आवाजही गोड होता.. प्रयत्न केला असता तर ती पार्श्वगायीकाही होऊ शकली असती आणि म्हणुनच लता मंगेशकर म्हणायच्या '' माझ्या आवाजातली गाणी मला फक्त नुतनच्या तोंडूनच ऐकावीशी वाटतात.. तीच त्यांना योग्य न्याय देते..'' चित्रपटाच्या चौकटीतुन बाहेर पडली की



नुतन एक नीखळ माणूस होती.. कसलाही गर्व नसणारी.. सायनला तीच घर होत पण पत्रकार ललीता ताम्हाणे यांच्याशी ओळख होताच नुतन स्वता त्यांच्या ठाण्यातल्या घरी जायची..दिवसभर तीथेच थांबायची, तीथेच जेवायची...कीती भाग्याची गोष्ट...

वसुंधरा साबळे

सीमा, बंदिनी, सुजाता, सौदागर अशा असंख्य चित्रपटातली नुतन आपण विसरु शकतो का? '' बंदिनी '' मधली '' मोरा गोरा रंग लैले '' म्हणत प्रियकराला भेटायला अतुर झालेली नटखट नुतन शेवटी त्याच प्रियकराची असहाय्य अवस्था बघून समोरचा उज्वल भविष्यकाळ लाथाडून '' मेरे साजन हैं उसपार '' या शब्दांबरोबर कासावीस होत धावत सुटते त्यावेळची तीची तगमग आपण वीसरु शकतो? '' सुजाता '' मधली नुतन आपण वीसरु शकतो? बरेच तीचे चित्रपट आहेत त्यातल्या तीच्या अभिनयाची मिमांसा मी करुच शकत नाही...

आज तीचा वाढदिवस.. माझ्यासाठी ती आणि स्मिता पाटील या दोघीही सौंदर्याचा अंतीम शब्द आहेत त्यामुळे त्या दोघीही मला शापीत अप्सराच वाटतात...आपण फक्त त्यांची आठवण काढत रहायच...

***



# इंदापुरी निखारे

## प्रेमकथा....



**ज्योतिर्मय साहित्य**

कथारती ही कथा एका साध्या आरतीपासून सुरू झालेल्या प्रेमकथेची आहे. जी गावातील मंदिरात आरतीच्या प्रसंगा दरम्यान सुरु होते.

भारतीय संस्कृती मध्ये आरतीचे महत्व अनन्यसाधारण आहे. अशाच एका गावात आरती झाल्यावर आरतीचे तबक फिरवताना एका तरुण मुलीचा हलकासा स्पर्श होतो आणि तरुणाला एका रम्य स्वप्नात घेऊन जातो. तिथेच त्यांच्या प्रेमकथेची सुरुवात होते.

सुरुवातीला त्यांच्या नजरेतून आणि स्पर्शातून भावना व्यक्त होतात. नंतरच्या काही दिवसांत त्यांच्यातील जवळीक वाढते. तिने नाजूकपणे हातात अंगठी घेतली आणि त्याच्या प्रेमाला मूक संमती दिली...

पण या सगळ्यावर गावातील एक तीक्ष्ण नजर रोखून पाहत असते.

ती व्यक्ती एकदा ते दोघे एकांतात असताना भेटते आणि दोघांना एका संकटाची जाणीव करून देते ! सांगते की, काही अज्ञात शक्ती त्यांच्या प्रेमात अडथळे आणणार आहेत. परंतु, उपाय म्हणून एक विशिष्ट विधी करावा लागेल. तुम्ही दोघांना लग्न करायचे असेल तर?

ते दोघे या विधीसाठी ते गुरुजींकडे जातात, आणि त्यांची मंजूरी मिळवतात. आता प्रश्न असा आहे की, या प्रेमकथेचा शेवट विधी करून सुखरूप होतो की काही नव्या संकटांचा सामना करावा लागतो?

तो विधी सुरु असतांना त्याच्याही मनात उलट सुलट विचारांच्या भावभावना !

वाचवा वाचवा अशा किंकाळ्या,

भयभीत करून टाकणारा असा आवाज !

तो त्याला सांगतो गुरुजी त्या अज्ञात शक्तीशी लढत आहेत, त्यामुळे ती घाबरून ओरडत असणार !

अचानक झाडावरील एक कावळा एका झाडावरून काव काव करत दुसऱ्या झाडावर, दुसऱ्या झाडावरील अनेक कावळे आनंदाने काव कावची सुरुवात, त्यांना आनंदाची बातमी समजते काव काव करत आनंदाने नदीच्या दिशेने...

पुलावरून कोरड्या नदीच्या पात्रात एक किंकाळी अंधाराला हदरवून टाकणारी रक्ताची रांगोळी एक तबक अचानक विजून जाते!दहा दिवस गावात दुखवटा... अकराव्या दिवशी एक तरुणी आरतीचे सुबक तबक घेऊन... सुहास्य वदनाने...




ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ



**आठवणीतले बालपण**

*मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर*
*- संजय व्यापारी, संपादक,*
*ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.*

# सत्य घटनेचा वास्तव अनुभव....‘‘बिटरस्वीट‘‘


**‘बुसान आतंरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल’मध्ये कौतुकास प्राप्त ठरलेला राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनंत महादेवन दिग्दर्शित ‘बिटरस्वीट’ हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाला बुसान फेस्टिव्हलमध्ये JISEOK या मानाच्या पुरस्कारासाठी देखील नामांकन मिळालेलं आहे. या चित्रपटावर टाकलेला या दृष्टीक्षेप....**

‘बिटरस्वीट’ या चित्रपटातून महिला उसतोड कामगारांच्या जीवनावर आधारित या चित्रपटात मानवी मुल्यांच्या जागतिक प्रश्नावर भाष्य करण्यात आलेलं आहे. साखर उद्योग क्षेत्रातील वास्तव या निमित्ताने प्रेक्षकांच्या समोर मांडलं गेलं आहे. या क्षेत्रातील उस तोड महिला कामगारांची व्यथा आणि समाजाकडून होणारं त्यांचं शोषण या चित्रपटात दाखवण्यात आले आहे. बऱ्याचदा शेतात अहोरात्र मेहनत करण्यासाठी या महिला कामगारांची गर्भाशयच काढली जातात. असं केल्यामुळे त्याच्या कामात येणारा एक शारीरिक अडथळा दूर होतो असं मालकांचं म्हणणं असतं. विशेष म्हणजे असं अमानवी कृत्य करणाऱ्या लोकांविरूद्ध कोणीही उघडपणे बोलतही नाही. त्यामुळे या महिलांना काहिही न बोलताच हे सहन करतच आयुष्य घालावावं लागतं. ‘बिटरस्वीट’मध्येही अशाच एका सगुणा नावाच्या नायिकेची कथा दाखवण्यात आली आहे. जी या गोष्टीविरूद्ध संघर्ष करते, बंड पुकारते. सत्य घटनेवर आधारित कथा आणि चित्रपटाची मांडणी करण्यात आली आहे.

बिटरस्वीट हे चित्रपटाचे शीर्षक विचित्र आहे, परंतु चित्रपट निर्माते अनंत महादेवन यांनी या दोन्ही शब्दांना एकत्र करून असा अर्थ लावला आहे की त्याचा अर्थ त्याच्या शाब्दिक अर्थाच्या पलीकडे जातो. त्यांचा मराठीतील नवीन चित्रपट, तरुण सुगुणाच्या नजरेतून महाराष्ट्रातील बीड येथील साखर शेतीत काम करणाऱ्या मासिक पाळीच्या वयातील महिलांच्या दुःखद जीवनाचा शोध घेतो. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आणि २६ व्या कोलकाता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही हा चित्रपट लक्षवेधी ठरला आहे.या चित्रपटाची कथा महाराष्ट्र राज्यातील एका ज्वलंत सत्य घटनेवर आधारीत आहे. या चित्रपटाची कथा पटकथा दिग्दर्शन आणि संकलन आंतरराष्ट्रीय पातळीवर नेहमीच आपला ठसा उमटविणारे ख्यातमान दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी चार आघाडीवर कामगिरी यशस्वीपणे सांभाळली आहे. या चित्रपटात अक्षया गुरव, अनिल नगरकर, स्मिता तांबे, स्वर्गीय विनायक दिवेकर, असित रेडीज, गुरु ठाकूर, सुभाष जाधव, सुरेश विश्वकर्मा,विवेक चाबुस्कवार,भाग्यश्री पने यांच्या प्रमुख भूमिका आहेत. अल्फान्सो रॉय यांनी छायाचित्रण तसेच रोहित कुलकर्णी यांनी पार्श्वसंगीत दिले आहे आणि रमाकांत महाजन हे कला दिग्दर्शक आहेत. नंदू आचरेकर, राहुल सूर्यवंशी हे या चित्रपटाचे सहदिग्दर्शक आहेत . रोहन गोडांबे हे कार्यकारी निर्माते आहेत, तसेच या चित्रपटाच्या विषयाला अनुसरून अर्थपूर्ण असं संवाद लेखन लेखक महेंद्र पाटील यांने केलं आहे. बीड जिल्ह्यातील माजलगाव परिसरात या चित्रपटाचं चित्रीकरण झालं असून क्वेस्ट फिल्म ची निर्मिती असलेला या चित्रपटाची निर्मिती सुछंदा चँटर्जी ,शुभा शेट्टी यांनी केलेली आहे.

बिटरस्वीट हे महाराष्ट्राच्या रोखीने समृद्ध साखर उद्योगातील एका धक्कादायक विधीचे नाट्यमय पण खरे वर्णन आहे, जे भावनिकदृष्ट्या थकवणारे आणि जैविकदृष्ट्या विनाशकारी असू शकते! बिटरस्वीट सत्यभामा खरी कहाणी सांगते, ज्या महिलेने तिचा गर्भ काढून टाकण्याच्या विधीचा निषेध केला आणि त्याची तुलना अमेरिकेच्या काळोख्या गुलाम युगाशी केली. गुन्हेगारांना आणि पीडितांना हे कळत नाही की ते निसर्गाच्या संतुलनाशी खेळत आहेत आणि कदाचित भविष्यातील संपूर्ण संस्कृती नष्ट करत आहेत. सत्यभामा नावाच्या एका ऊसतोडणी कामगाराने इतर महिलांसोबत तिच्या कहाणीचे वर्णन केले तेव्हा माध्यमांनी बीड: द व्हिलेज ऑफ वुमन विदाउट वॉम्ब्स’’ या शीर्षकाची मथळा प्रकाशित झाला होता तो दिग्दर्शक यांच्या वाचनात आला . दुसऱ्या क्रमांकाचा साखर निर्यातदार देश असलेल्या भारताच्या गौरवात लपलेल्या गुपित्यांमध्ये खोलवर खोदकाम त्यांनी सुरू केले. महाराष्ट्रात १० लाख ऊसतोडणी कामगार आहेत, त्यापैकी निम्मे बीडचे आहेत. नागरी हक्क संघटनांच्या आकडेवारीनुसार बीडमध्ये गर्भाशय काढून टाकण्याचे प्रमाण उर्वरित राज्यापेक्षा १४% जास्त आहे.

दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी चित्रपटासाठी केलेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे की







लाखो ऊसतोडणी कामगार ऑक्टोबर ते मार्च या काळात पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतर करतात – साखर पट्ट्यात ऊसतोडणीचा हंगाम. या प्रदेशात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना, स्थलांतर दुप्पट होते. येथील कंत्राटदारांना महिलांच्या मासिक पाळीची समस्या आहे, कारण त्यामुळे त्यांच्या कामात अडथळा येतो. स्वाभाविकच, मासिक पाळीच्या वेळी महिला अनेकदा एक किंवा दोन दिवसांची रजा मागतात. गर्दीच्या हंगामात कंत्राटदारांसाठी हे अस्वीकार्य आहे आणि त्यांना रजा देण्याऐवजी त्यासाठी दंड आकारला जातो. शेतातील करार पती-पत्नीला एकाच युनिटमध्ये गणले जातात, ज्यामुळे संपूर्ण कुटुंबावर परिणाम होतो. अशा धोकादायक परिणामांपासून वाचण्यासाठी, बीडमधील महिलांना त्यांचे गर्भाशय काढून टाकणे चांगले वाटते. बीड जिल्ह्यात ९९ खाजगी रुग्णालये आहेत आणि त्यापैकी ११ रुग्णालयांनी गेल्या तीन वर्षांत १०० हून अधिक गर्भाशय काढून टाकले आहेत. महाराष्ट्रात सुमारे ४६०५ महिलांचे गर्भाशय काढून टाकण्यात आले आहे आणि बीडमध्ये हा दर राज्य किंवा देशापेक्षा १४ पट जास्त आहे. ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या सहा महिन्यांच्या पीक हंगामात दरवर्षी बीडला येणाऱ्या अनेक ऊसतोड कामगारांपैकी २२ वर्षांची सुगुणा ही फक्त एक तुकडा आहे. तिच्या आजारी वडिलांनी गेल्या वर्षीचे हजारो रुपयांचे कर्ज फेडण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे तिला पगाराशिवाय काम करावे लागते. ऊसतोडण्यात अनुभवी नसली तरी, सुगुणा तिच्या वडिलांच्या वयापेक्षा जास्त वयाच्या कामगारांच्या कामाची भरपाई करण्यासाठी दररोज तिचे उत्पादन वाढवण्याचा दृढनिश्चय करते. अशाच एका दिवसात सुगुणाला कटू सत्य कळते. मासिक पाळीच्या तीव्र त्रासामुळे तीन दिवस अनुपस्थित राहिल्याने तिला कळते की तिचा पगार बराच कमी झाला आहे आणि साखर कंत्राटदाराला मोठा दंड भरून तिला आणखी भरपाई करावी लागेल. त्यानंतर ती कायमचे गर्भ गमावण्याची किंवा गरिबी आणि कर्जाच्या ओझ्याखाली जगण्याची कोंडी करण्याची कोंडी करते.


बिटरस्वीटमधील एका दृश्यात अक्षया गुरव सुगुणा सामाजिक कार्यकर्त्या गोयलकडे सल्ला मागते आणि जरी त्यांनी तिला या अमानवी नियमाविरुद्ध निषेध करण्यास सांगितले तरी, कंत्राटदार तिला वैद्यकीय ऑपरेशन करण्यासाठी आगाऊ पैसे देण्याची ऑफर देतो. त्यामुळे गर्भाशय काढून टाकण्याचा खर्च कंत्राटदाराने उचलावा लागतो, ज्याचा स्त्रीरोगतज्ज्ञ आणि नर्सिंग होमशी करार आहे. तथापि, करार असा आहे की एकदा ऑपरेशन झाल्यानंतर, महिलेला हप्त्यांमध्ये पैसे परत करावे लागतील. शेवटी शरणागती पत्करावी लागल्याने, ती आयुष्यात कधीही आई न होण्याचा निर्णय घेते – तिला हे कळत नाही की तिच्या शरीरावरील अधिकार, गर्भधारणा करण्याचा, बाळंतपणाचा आणि जन्म देण्याचा तिचा निर्णय तिच्याकडून कायमचा बेकायदेशीर आणि अनैतिकपणे हिरावून घेतला जात आहे. जरी हे काम प्रामुख्याने माहितीपट स्वरूपात असले तरी, सुगुणाच्या गर्भावर हक्क राखण्यासाठीच्या संघर्षाच्या उलगडण्यात काल्पनिक कथा प्रभावीपणे मिसळल्या आहेत. तथापि, संपूर्ण कलाकारांचा अभिनय इतका सजीव आणि स्पष्ट आहे की एखाद्याला असे वाटते की ते खरोखरच तेच पात्र साकारत आहेत. निर्माते, सुचंदा चॅटर्जी आणि शुभा शेट्टी यांना या विषयाने प्रेरणा दिली आणि त्यांनी तीन दिवसांत निधी उभारून, बिटरस्वीट सिनेमाची निर्मिती केली.

या चित्रपटातून पदार्पण करणारी मराठी मॉडेल आणि अभिनेत्री अक्षया गुरव ही भूमिका अशा प्रकारे साकारते जणू तिने स्वतः सर्वकाही अनुभवले आहे. अनिल नगरवार हे कॉन्ट्रॅक्टर म्हणून, विकास राणे म्हणून, गुरु ठाकूर हे स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून, स्मिता तांबे हे सुगुणाच्या आईच्या भूमिकेत आणि विनायक देवेकर हे तिच्या वृद्ध आणि आजारी वडिलांच्या भूमिकेत आहेत. संगीत कमी दर्जाचे आहे आणि एडिटिंग चांगले आहे, कारण कॅमेरा बीड जिल्ह्यातील माजलगावसारख्या गावांमधून फिरतो, जिथे उसाची शेते आणि विस्तीर्ण ऊस गिरण्या परिपूर्ण पार्श्वभूमी देतात.चित्रपट निर्माते उपेक्षितांच्या, विशेषतः महिलांच्या या भयानक शोषणाचे कारण असे स्पष्ट करतातः ‘‘जगात साखरेचा पहिला क्रमांकाचा निर्यातदार म्हणून ब्राझीलला मागे टाकण्याच्या प्रयत्नात , साखर उद्योगातील उद्योजक शेतात काम करणाऱ्या महिला कामगारांचे गुप्तपणे शोषण करतात. त्यांना गर्भाशय काढून टाकण्यास प्रवृत्त करून, ही व्यवस्था कापणाऱ्यांवर मानसिक ताण देण्यासोबतच मानवजातीच्या सर्व नैसर्गिक जैविक प्रगतीलाही आव्हान देते. नेतृत्वाखालील लोक इतके शक्तिशाली आहेत की या भयानक कृत्यासाठी त्यांच्यावर काहीही आरोप लावता येत नाही. आणि हाच भयावह भाग आहे. सुगुणाने सत्य उघड करण्याचे धाडस केले. ही तिची खरी कहाणी आहे, परंतु ती दडपून टाकण्यात आली आणि गालिच्याखाली ढकलण्यात आली. हा चित्रपट म्हणजे कडू गोड ही जगण्याची वास्तव कहाणी आहे...आवर्जून बघावा असा हा सिनेमा आहे.

# साने गुरुजी

**ज्योतिर्मय साहित्य**

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग



घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# गश्मीर महाजनीचा नवा अध्याय सुरू, वाढदिवसानिमित्त पहिल्या दिग्दर्शकीय चित्रपटाची घोषणा

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता गश्मीर महाजनी आता एका नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गश्मीरने चित्रपट, हिंदी मालिका, नृत्यामुळे प्रेक्षकांच्या मनात स्वतःचे एक स्थान निर्माण केले आहे. आता गश्मीर लेखक-दिग्दर्शक आणि निर्मात्याच्या भूमिकेत पदार्पण करत आहे. विशेष म्हणजे, त्याच्या वाढदिवसानिमित्ताने त्याने त्याच्या या पहिल्या चित्रपटाच्या मुहूर्ताची सोशल मीडियावर घोषणा केली. जीआरम्स इव्हेंट्स अँड प्रॉडक्शन या निर्मिती संस्थेअंतर्गत या चित्रपटाची निर्मिती होत आहे.

या चित्रपटाचे निर्माते गौरी महाजनी, माधवी महाजनी आणि गश्मीर महाजनी असून लेखन व दिग्दर्शन गश्मीर स्वतः करत आहे. अभिनय क्षेत्रात अनेक वर्षांचा अनुभव असलेला गश्मीर आता कॅमेऱ्यामागे जाऊन एक नव्या प्रवासाला सुरुवात करत आहे. या चित्रपटाचे छायाचित्रण सुप्रसिद्ध डीओपी सत्यजीत शोभा श्रीराम यांच्या कॅमेऱ्यातून साकारले



जात आहे. गश्मीरच्या या नव्या इनिंगबद्दल मराठी सिनेसृष्टीतूनही शुभेच्छांचा वर्षाव होत असून या चित्रपटाचं नाव आणि कलाकार जाणून घेण्याबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

आपल्या या नवीन प्रवासाविषयी गश्मीर महाजनी म्हणतो, ‘‘दिग्दर्शन हे माझं एक दीर्घकाळापासूनचं स्वप्न आहे. अभिनय करताना अनेक गोष्टी शिकल्या, अनुभवल्या आणि आत खोलवर काही सांगायचं राहून गेलं होतं. आता त्या भावना, ती विचारांची प्रक्रिया मी कॅमेऱ्याच्या मागून मांडणार आहे. चित्रपट ही एक सामूहिक कला आहे, मात्र काही कथा अशा असतात, ज्या फक्त आपल्या दृष्टिकोनातूनच सांगितल्या जाऊ शकतात. माझा हा चित्रपट म्हणजे माझ्या मनात कित्येक वर्षांपासून रुजत गेलेली कल्पना आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने ही गोष्ट सुरू करत असल्यामुळे हे एक भावनिक आणि प्रेरणादायी क्षण आहेत. ही जबाबदारी मोठी आहे, परंतु प्रेक्षकांचा विश्वास आणि प्रेम हेच माझं बळ आहे.’’




# कुशीत घेणारे माझे घरकुल आणि त्याचा प्रेमगारवा


**ज्योतिर्मय साहित्य**

घर किती मोठे, किती सुंदर छान सजवलेले आहे या पेक्षा तुमचे त्याचे बंध कसे जुळलेत हे खूप महत्वाचे आहे असे मला नेहमी वाटते.. आपण ज्यावेळी नवीन घरी प्रवेश करतो त्यावेळी कुंकवाचे पंजे भिंतीवर उमटवण्याचा एक विधी असतो कदाचित त्याच वेळेला आपल्या हाताचा प्रेमस्पर्श भिंतीत मुरला तर ते नेहमीसाठी अलगद तुम्हांला आई सारखे कुशीत घेते आणि कितीही थकले तरी त्यातील प्रेम गारवा कमी होत नाही..

अगदी याच भावना माझ्या मिरजेच्या घराबद्दल मनात नेहमी येतात.छोटा, साधा फ्लॅट पण समोरच्या टेरेसने त्याला आपल्यात सहज सामावून घेतल्यामुळे त्याचे छोटेपण कुठे कधीच जाणवले नाही.भरपूर ऊन वारा उजेड या मुळे प्रसन्नता भरून राहिलेली.. टेरेसमुळे आणि मिरज अजूनही तसे छोटे सुधारलेले गाव असल्यामुळे आसपास फार ऊंच कोणतीच इमारत नाही त्यामुळे सगळ्या प्रहरांचा आणि ऋतुंच्या सोहळ्याचा आनंद इथे भरभरून मिळतो.

या घरात मी तीन तप राहिले.अगदी चौथ्या पिढीची माझ्या दोन्ही नातवंडांची पाऊले ही या घरात अधून मधून अजूनही खेळत आहेत. श्रीमंती, गरिबी, सुख, दुःख मान, अपमान, आजारपण, जन्म मृत्यू सगळ्यासगळ्यात या घराची मनस्वी साथ नेहमी मिळत राहिली.

या टेरेसवरच्या मांडवाखाली लग्न सोहळ्यातील इतर कार्यक्रम रंगले, जेवणावळी झाल्या, अनेक वर्षे उन्हाळ्यात आकाशातील चंद्र चांदण्यांनी नटलेली, रोज नवीनच सौंदर्यात बहरलेली




निळी शाल अंगावर अलगद ओढून घेत झोपता आले... पहाट, सायंकाळचे आकाश विभ्रम,श्रावणसरी,इंद्रधनुष्य, गच्चीत लावलेल्या झाडातील फुलांचा सुगंध, मुले मग नातवंडे आणि त्यांच्या सावंगड्या बरोबर खेळलेले खेळ, इमारती मधील सर्वांबरोबर एकत्रित केलेले छोटे मोठे कार्यक्रम, गप्पा टप्पा किती कितीतरी सुंदर आठवांचा मनात नेहमीच फुलत आणि दरवळत राहणारा हा गोफ आहे.

घर प्रिय असल्याचे अजून एक कारण म्हणजे शेजार..मी इथे आले त्यावेळी आम्हीं सगळेच नवीन होतो माझ्याच वयाच्या आसपास अजून तिघी होत्या आमची मुलेही साधारण एका पाठी एक असलेली.आमचे सगळ्यांचे मैत्र छान जुळले.आम्हां सगळ्यांची मुलेही एकमेकांबरोबर वाढली,खेळली.

कोणत्याही चांगल्या,वाईट प्रसंगी एकमेकांसाठी सगळी ती धाऊन येत..अजूनही येतात..माझ्या सासरे, सासूबाईंच्या वयाच्या व्यक्तीही या इमारती मध्ये होत्या.. कदाचित पूर्व जन्मीचे पुण्याईने मला त्यांचेही प्रेम, आशीर्वाद भरभरून मिळाले..यातील काहीजण आता गाव सोडून गेले काहीं गावातच दुसरीकडे राहायला गेले. पण मैत्र तेच राहिले उलट तिथे नवीन राहायला आलेल्या लोकांच्यामुळे प्रेम आणि मैत्र संख्येत भर पडत गेली.

एकूणच आसपासचे वातावरण, सुसंस्कार यामुळे मुलांच्या घडणीला हातभार लागला हे नक्कीच.. आता या इमारतीमधील पाखरे दूर गेली त्यात माझीही दोन्हीं पाखरे आहेत.. त्यामुळे आम्हा दोघांनाही आता पुण्याला यावे लागले.त्यामुळे या घराचे दर्शन, सहवास क्वचित आणि कमी मिळणार या जाणिवेने याचा निरोप घेताना मन आणि डोळे दोन्हीं भरून आले.

हे घर जुने झालेय, थोडे थकले पण आहे.छोटे असल्याने एकत्र जमल्यावर पसारा खूप होतो पण त्याने लावलेली माया आणि ओढ काही वेगळीच आहे. पुण्याचे घर तसे प्रशस्त,सर्व सुखसोयी असूनही नवीन पिढीतली मुलगा, सून सगळ्या गैरसोयींना सहज स्वीकारत इकडे यायला उत्सुक असतात ही या घराच्या प्रेमाची किमयाच म्हणावी लागेल. हो ना?

माझ्यासाठी पुणे गाव नवीन आहे तसेच इथले घरही खूप छान आहे पण माझ्यासाठी थोडे अजून अनोळखी आहे. हळूहळू याच्याशीही माझे मैत्र जुळतेय. इथेही नातवंडांच्या संगतीत मी नक्कीच रमेन..पण त्या घराचे रेशीम बंध नेहमीच स्मरणात आणि मनात दरवळत राहतील. अगदी माझ्या दारातील हिव्यागार तुळशी सारखे हे मात्र नक्की.. आणि ही पण खात्री आहे की मी कधीही तिथे गेले तर तितक्याच अपार मायेने माझे ते मिरजेतील घर मला कुशीत घेईल..

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559